# भारताच्या आर्थिक विकासात महिलांचे कृषीविषयक योगदान

**डॉ.चांगदेव अरविंद बंडगर** दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र शिवाजी विद्यापीठ ,कोल्हापूर

---

**प्रस्तावना** :-

सध्यास्थितीत पुरुषांच्या प्रत्येक क्षेत्रात महिला उत्तुंग भरारी घेत आहेत. मग ते क्षेत्र कोणतेही असो स्त्रियांचे कर्तुत्व वाखनन्याजोगे आहे.अनादी काळापासून समाज व्यवस्थेमध्ये महिलांना दुय्यम स्थान असूनही दुर्लक्षित राहिलेल्या स्त्रियानी आपल्या कष्टाने आणि श्रमाने मोठे योगदान दिलेले आहे .कृषी व्यवसायात प्राचीन काळापासून पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांनीही अनन्य साधारण योगदान दिले आहे.शेतीचा शोध लावला तोही एका स्त्रिनेच आणि सध्यस्थितीत शेतीतील बहुतेक सर्व ठिकाणी महिलाच शेतीतील सर्व कामे पार पाडत असतात. शेतीचा संपूर्ण डोलारा स्त्रियांवरतीच आहे. शेती व्यवसायात काम करणाऱ्या स्त्रियांची संख्या अधिक असून शेतकरी किंवा शेतमजूर स्त्रिया काम करतात.त्यामुळेच देशाच्या दरडोई उत्पन्नामध्ये जवळजवळ १८% वाटा हा कृषि व्यवसायाचा राहिलेला आहे .

**उद्दिष्टे** :-

१. महिलांच्या कृषीविषयक कार्याचा आढावा घेणे.
२ .महिलांच्या कृषि रोजंदारीचा अभ्यास करणे.
३. कृषी व्यवसायात महिलांना येणाऱ्या आव्हानांचा अभ्यास करणे.
४ . महिलांच्या एकूणच कृषि सहभागाचा आणि वास्तवतेचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती ;-**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी संशोधकाने दुय्यम संदर्भ साधनांचा उपयोग केला आहे. त्यामध्ये लेख,पुस्तके,वृत्तपत्रे ,इत्यादींचा समावेश केला आहे. माहितीची विश्वासाहर्ता तपासून वस्तुनिष्ट मांडणी केली आहे.

**शेतीचे स्त्रीकरण :-**

पुरुषांच्या शहराकडे वाढत्या स्थलांतरामुळे कृषि क्षेत्राचे स्त्रीकरण होत चालले आहे.ज्यामध्ये महिला शेतकरी,उदयोजिका आणि कामगार अशा वेगवेगळ्या भूमिकेमध्ये दिसत आहेत .जागतिक स्तरावर अन्नसुरक्षा सुनिश्चित करण्यात आणि स्थानिक कृषी-जैवविविधता जपण्यात महिलांनी निर्णायक भूमिका पार पाडल्याचे दिसून येते.त्यासाठी ग्रामीण महिला दैनंदिन घरगुती गरजा पूर्ण करण्यासाठी अनेक नैसर्गिक संसाधनाचा वापर करताना आढळून येतात.

कृषीमूल्य साखळीतील उत्पादन,कापणीपूर्व,कापणी नंतरची प्रक्रिया, बांधणी, विपणन या सर्व स्तरावर महिलांचे वर्चस्व असल्याने ग्रामीण महिला श्रमप्रधान कामे करताना आढळून येतात .त्यामध्ये तण काढणे. कोळपणी करणे,गवत कापणे, वेचणे,कापसाच्या काड्या गोळा करणे, बियाणापासून कापूस वेगळा करणे ,पशुधन राखणे,दूध काढून त्यावर प्रक्रिया करणे इ .सर्व कामे स्त्रियाच करताना दिसतात . त्यामुळेच शेतीचे स्त्रीकरण झाले असे म्हणावे लागेल.”

**कृषीमध्ये महिला शेतकऱ्यांची भूमिका :-**

महिला शेतकरी शेतीमध्ये महत्वाची आणि बहुआयामी भूमिका पार पाडताना आढळून येतात. अन्न उत्पादन,आर्थिक स्थिरता आणि ग्रामीण विकासात त्या महत्वपूर्ण योगदान देताना दिसतात . त्यांच्या या भूमिकेचे काही पैलू पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१ ) अन्न उत्पादन :-

पीक लागवड :-

महिलांवर भात,मका आणि भाज्या यासारख्या मुख्य पिकांसह विविध पिके घेण्याची जबाबदारी असते. अनेक प्रदेशामध्ये त्या कौटुंबिक ,बागा आणि लहान-मोट्या शेतांची काळजी घेताना दिसतात .

**पशुधन व्यवस्थापन :-**

बऱ्याचदा महिला पशुधन सांभाळतात. ज्यामुळे अन्न सुरक्षा आणि दुग्धव्यवसाय,मांस आणि अंडी उत्पादनाद्वारे उत्पन्न मिळते .

२ ) आर्थिक योगदान :-

उत्पन्न निर्मिती :-

महिला शेतकरी कृषि विषयक कायद्याद्वारे त्यांच्या कुटुंबाच्या उत्पन्नात हातभार लावतात व बहुतेकवेळा उत्पादन हस्तकलेच्या बाजारपेठेत विक्री करतात. त्या ग्रामीण भागात शेतीच्या कामासाठी कामगार नियुक्त करून आणि सहकारी शेतीमध्ये सहभागी होऊन रोजगाराच्या संधी निर्माण करतात .

३ ) शाश्वत पद्धती :-

**कृषी पर्यावरणशास्त्र:-**

बहुतेकदा स्त्रिया शाश्वत शेती करताना दिसतात . मातीचे आरोग्य राखण्यासाठी आणि संसाधनचे संवर्धन करण्यासाठी पारंपारिक ज्ञान आणि जैवविविधतेचा वापर करतात.

**संसाधन व्यवस्थापन**

स्त्रिया संसाधनाचे व्यवस्थापन करून पर्यावरण टिकवून ठेवणाऱ्या पद्धतीला प्रोत्साहन देण्याची महत्वाची भूमिका बजावतात.

४ )समुदाय नेतृत्व :-

निर्णय घेणे :-

महिला शेतकरी अनेकवेळेला ज्ञान आणि कौशल्ये यांचा मिलाप करतात त्यामुळे योग्य निर्णय घेण्यासाठी त्याचा उपयोग होतो .ज्यामुळे समुदायाची लवचिकता आणि नवोपक्रम वाढीस लागतो.”

**कृषीमध्ये महिलांची आकडेवारी :-**

कृषीला हजारो वर्षांचा इतिहास आहे आणि यामध्ये महीलांची भूमिका खूप महत्वाची आहे. कारण महिलांशिवाय शेती होऊच शकत नाही ,त्यामुळे पर्यायाने या क्षेत्रात असणारी महिलांची आकडेवारी अभ्यासणे अपरिहार्य आहे.

कृषीशी संबंधित आकडेवारीनुसार भारतातील ग्रामीण भागातील जवळजवळ ७३. २ % महिला कृषी क्षेत्रात काम करतात. परंतू केवळ १२% स्त्रियांकडे शेतजमीन त्यांच्या मालकीची आहे .

द इंडिया ह्युमन डेव्हलपमेंट सर्वेच्या अहवालानुसार ८३ % शेतजमीन पुरुषांच्या मालकीची आहे. तर फक्त २ % जमीन स्त्रियांच्या मालकीची आहे. याचा अर्थ स्त्रियांना शेतकरी मानले जात नाही . ऑक्सफॅम् ,नावाच्या संस्थेच्या अहवालात म्हटले आहे . की ,महिलांचा कृषि विषयक, सरकारी समित्या आणि योजना राबविण्यामध्ये केवळ २.३ %सहभाग आहे .याचे प्रत्यंतर आपल्याला पंचायत व आजूबाजूच्या परिसरातील कृषी सहायक पदावर किती महिला कार्यरत आहेत . यावरून लक्षात येते.

२०१९ -२० च्या आर्थिक सर्वेक्षणानुसार या वर्षात फारच जास्त स्थलांतर झाल्याने शेतीत महिलांचा सहभाग पूर्वीपेक्षा जास्त वाढला आहे .

याचा अर्थ असा की रोजगाराच्या शोधात गावोगवचे तरुण शहराकडे स्थलांतरित झाल्यामुळे घरगुती शेतीची जबाबदारी स्त्रियांवर येऊन पडली . तथापि कोणत्याही सातबारा उताऱ्यावर स्त्रियांच्या नावाचा उल्लेख दिसत नाही.

**महिला शेतकऱ्यांसाठी सरकारच्या योजना :-**

महिला शेतकऱ्यानी कृषिमध्ये अधिक अधिक सक्रिय होण्यासाठी केंद्र सरकार तसेच राज्यसरकार मार्फत अनेक योजना राबवल्या जातात .केंद्रीय ग्राम विकास मंत्रालयांतर्गत महिला किसान सशक्तीकरण आयोजन(एम के एसपी)राबवली जाते . या योजनेअंतर्गत महिला शेतकऱ्यांच्या सक्षमी करणासाठी अधिकअधिक गुंतवणूक करून त्यांचा शेतीतील सहभाग आणि उत्पादक्ता वाढवण्याचा प्रयत्न केला जातो.

दिनदयाळ उपाध्याय योजनेअंतर्गत राष्ट्रीय जीवनोंनती मिशन राबवण्यात येते. महिला किसान सशक्तीकरण परियोजना हा या मिशनचा एक भाग आहे .या अंतर्गत देशभरातील ४० लाखाच्या आसपास महिला शेतकऱ्याना प्रशिक्षित करण्यात आले आहे . आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती कृषी क्षेत्रातील महिला शेतकऱ्याना सुलभतेने व्हावी यासाठी महिला शेतकऱ्याना कौशल्य प्राप्तीचे प्रशिक्षण दिले जाते. या प्रशिक्षणाचा कालावधी किमान २०० तास असतो . हे प्रशिक्षण संस्था ,राज्य कृषी व्यवस्थापन आणि विस्तार प्रशिक्षण ,संस्था कृषी विज्ञान ,संस्था ,कृषी विद्यापीठे यांच्या मार्फत दिले जाते. कृषी पर्यावरणीय पद्धतीबाबत समुदाय संसाधन व्यक्तीकडून प्रशिक्षण दिले जाते . कृषी विज्ञान केंद्रामध्ये कृषी आणि त्यांच्याशी संबधित इतर क्षेत्राशी संबधित पैलूचे शिक्षण दिले जाते.

**महिला शेतकऱ्यानसमोरील आव्हाने :-**

कृषिमध्ये सर्वात जास्त कामाचा हिस्सा महिला उचलत असूनदेखील त्यांना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते . त्यामध्ये पुढील बाबींचा समावेश होतो .

१ ) जमिनीच्या मालकीचा अभाव

२ ) आर्थिक कर्जाची उपलब्धता नसणे.

३ ) संसाधनाचा आणि आधुनिक साधनांचा अभाव (बहुतेक शेती यंत्रसामग्री महिलांसाठी चालवणे कठीण असते )

४ ) कमी मोबदल्यासह वाढलेले कामाचे ओझे (शेतीवरील आणि शेतीबाहेरील उत्पादक उपक्रम )

**निष्कर्ष** :-

भारताचा किंबहुना जगाचा इतिहास पहाता,असे दिसते की ,सर्वच क्षेत्रात अगदी प्राचीन काळापासून स्त्रिया अग्रेसर आहेत . त्यांनी आपल्या कार्यकर्तुत्वने पुरुषांच्या बरोबरीने प्रत्येक क्षेत्रात आपला ठसा उमटवून यशाची उंच शिखरे गाठली आहेत . महिलांच्या अनेक क्षेत्रातील योगदानापैकी सर्वात जास्त महिला सक्रिय असलेले क्षेत्र म्हणजे कृषि क्षेत्र होय .कृषिमध्ये जवळजवळ निम्म्यापेक्षा अधिक वाटा हा महिलानीच उचलेला आहे . शेतामध्ये पेरणी करणे ,तण काढणे ,कापणी मळणी आणि त्यानंतर पिकांची योग्य देखभाल करण्याचे काम स्त्रियाच करतात . या कृषि कामबरोबरच पूरक व्यवसाय म्हणून पशुपालन ,दुगधव्यवसाय ,कुक्कुटपालन इ . पूरक व्यवसाय करून स्त्रिया केवळ आपल्या कुटुंबालच नव्हे तर ,देशाच्या एकून उत्पन्नामध्ये हातभार लावतात . सध्यस्थितीत महिला शेतमजूर आणि आणि महिला शेतकरी म्हणून कार्य करतात.

एकंदरित कृषी व्यवसायमध्ये जवळजवळ ७५% महिला कार्यरत असूनदेखील त्यांना समाजात दुय्यम स्थान दिले जाते ती केवळ स्त्री आहे या लिंगभेदामुळे महिलांच्या कामाचे मूल्य विचारात घेतले जात नाही .संपूर्ण शेतीची कामे महिला करत असून देखील केवळ १२%जमीन त्यांच्या नावावर आहे त्यामुळे समाजात तिला दुय्यम स्थान आहे .भारत सरकारने स्त्रियांनाही वडिलांच्या मालमत्तेत हक्क दिल असला तरी त्यांची अजून नीट अंमल बजावणी झालेली दिसत नाही त्यामुळे कृषी व्यवसायात त्यांचे महत्वपूर्ण योगदान अजूनही त्या उपेक्षित राहिल्या आहे .

**शिफारशी** :-

१. पुरुषांच्या बरोबरीने महिलांना मालकी हक्क दिल्यास आणि ७ /१२ त्यांच्या नावावर असल्यास महिला कृषीमध्ये अधिक सहभागी होऊन भारताच्या आर्थिक उत्पन्नामध्ये आणखी भर पडेल.

2. शेतीतील सर्व कामे स्त्रियाच करत असूनही पुरुषांच्या तुलनेत त्यांना मिळणारे वेतन फारच अल्प असते . लिंगभेदाच्या या मानसिकतेत बदल होऊन समान कामासाठी समान वेतन मिळाल्यास स्त्रियांचा आर्थिक दर्ज सुधारण्यास मदत होईल.

3. शासनामार्फत महिला शेतकऱ्यांसाठी अनेक योजना राबवल्या जात असल्या तरी या योजनांची अंमलबजावणी होताना दिसत नाही त्यामुळे महिला शेतकऱ्याना कर्ज मिळण्यास अनेक अडचणी येतात. शासकीय पातळीवर योजनांची योग्य अंमलबजावणी झाल्यास निश्चितच कृषि क्षेत्रात महिला सक्षमी करण घडून येईल.

**संदर्भ**:-

1. https://agriculture.in/viewcontent/agriculture/women-and-agriculture/role-of-women-in-agriculture-and-its-allied-fields?ign=en .
2. https://www.quara.com/what-is-the-role-of-famale-farmers-in-agriculture.
3. https://www.maxmaharashtra.com/max-blog/women farmers-and-farmers-protest-history-and-present-written by-vikas -meshram-900123.
4. https://www.yashaswiudyojak,com/mksp-women-in-india-should-get-agriculture-knowlege-for-finacial-independence.
5. https://www.drishtiias.com/printpdf/feminization-of-agriculture.